जा.क्र.मिभामनपा/लेखा/परिपत्रक/ ३९१ /२०२५-२६
लेखा विभाग, चौथा मजला दि. ०३/११/२०२५
मिरा-भाईंदर महानगरपालिका
दिनांक :-

## //परिपत्रक//

या परिपत्रकाव्दारे सर्व विभाग/विभागप्रमुखांना कळविण्यांत येत आहे की, जीएसटी विभागाकडून प्राप्त निर्देशानुसार ज्या देयकातून जीएसटी रकमेची कपात करण्यांत येत आहे. अशा देयकांचे रिटर्न फाईल करताना त्या देयकाचा E-Invoice नंबर नमूद करणे बंधनकारक आहे. E-Invoice नमूद न करता रिटर्न फाईल केल्यास सदरील ठेकेदार/पुरवठादार यांना जीएसटी रकमेचा परतावा मिळेल याची खात्री देता येत नाही. तसेच याप्रमाणे E-Invoice नंबर नमूद न करता रिटर्न फाईल केलेनंतर कोणत्याही प्रकारची दुरुस्ती/सुधारणा होणार नाही.

जीएसटी विभागाच्या वरील निर्देशानुसार चालू महिन्यापासून जीएसटी रिटर्न फाईल करणेत येणार असून त्यासाठी प्रत्येक विभागाने ज्या देयकातून जीएसटी रकमेची कपात केली आहे. त्या देयकाची E-Invoice प्रत देयकासोबत लावणे बंधनकारक आहे. तसेच E-Invoice वरील सर्व तपशिल जसे की E-Invoice नंबर, तारीख व रकमा देयकासोबत जुळत असलेबाबतची खात्री करूनच देयके लेखा विभागात सादर करावीत.

तसेच जे ठेकेदार/पुरवठादार देयकाचे प्रदान झालेनंतर E-Invoice Generate करत असतील अशा सर्व ठेकेदार/पुरवठादार यांना सदरील E-Invoice ची एक प्रत लेखा शाखेत जमा करणेबाबतच्या सुचना आपल्या स्तरावर देणेत याव्यात. ज्या ठेकेदार/पुरवठादार यांची E-Invoice प्रत लेखा शाखेत वेळेत म्हणजेच प्रत्येक महिन्याच्या दि.०२ तारखेपर्यंत प्राप्त होणार नाही त्यांचे जीएसटी रिटर्न संबंधित महिन्यात फाईल न करता ज्या महिन्यात E-Invoice प्रत लेखा शाखेत प्राप्त होईल त्या महिन्यात केले जाईल याची स्पष्ट नोंद आपण घेवून तसे संबंधित ठेकेदार/पुरवठादार यांना आपल्या स्तरावर कळविणेत यावे.

**मा.आयुक्त सो., यांचे मान्यतेने**

**(शिरीष धनवे)**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी,**
**मिरा-भाईदर महानगरपालिका**